Research Article

# आदिलशाही सरदार रूस्तमेजमान आणि शिवाजी महाराज

**रविन्द्र मुन्द्रे**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग ,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

**Abstract :-**

शिवाजी महाराजांकडे माणसाला पारखण्याची चांगली दृष्टी होती. त्यांच्या या दृष्टीने त्यांना कधीही धोका दिला नाही. म्हणूनच आदिलशाहीत राहून रूस्तमेजमान या आदिलशाही सरदाराने स्वराज्य निर्मितीत आपला सहभाग दर्शविलेला दिसतो. अफजलखान प्रकरणात त्याने शिवाजींना केलेली मदत अमूल्य होती. एखाद्या साम्राज्याची निर्मिती करतांना स्वतःच्या सैन्यातच निष्ठावान लोकांचा भरणा असून चालत नाही तर शत्रूच्या सैन्यातील काही लोकांना हाताशी धरणे गरजेचे असते. रूस्तमेजमान महाराजांच्या उदात्त ध्येयाबद्दल साशंक नव्हता. म्हणून आपला जीव धोक्यात घालून त्याने शिवाजी महाराज आणि अनेक मराठा सरदारांचे प्राण वाचविले. म्हणजेच स्वराज्यात राहून स्वराज्यनिष्ठा दाखविणारे अनेक उदाहरणे शिवकाळात होते. परंतु शत्रूची चाकरी करून स्वराज्यास मदत करणारा रूस्तमेजमान हा एकमेव होता.

**Keywords :** रूस्तमेजमान, आदिलशाही, स्वराज्यनिष्ठा.

**प्रस्तावना :-**

स्वराज्यासाठी अनेकांनी आपल्या परीने योगदान दिले आहे. अनेकांनी आपली मूळ धन्याची चाकरी सोडून स्वराज्याच्या कार्याला वाहून घेतले. प्रामाणिकपणे चाकरी करून शिवाजी महाराजांच्या ध्येयपूर्तीसाठी आपले जीवन अर्पण केले. आपल्या मूळ धन्याची चाकरी सोडून त्यांच्याच विरोधात आक्रमक पाऊल उचलले, लढतांना पूर्वीच्या धन्याचा विचार न करता शिवाजीच्या स्वराज्यासाठी आपण लढलं पाहिजे आणि या भूमीवरून अन्याय व अत्याचार समूळ नष्ट केला पाहिजे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीत आपला मूळ धनी जरी शत्रू म्हणून समोर आला तर त्याला सुद्धा ठार मारावे, ही सवराज्यनिष्ठा शिवाजी महाराजांनी निर्माण केली होती. म्हणूनच आपला मूळ धन्याची चाकरी सोडून आलेले मोगली किंवा आदिलशाही सैनिक प्रामाणिकपणे स्वराज्याची सेवा करीत होते. मात्र एक मुस्लिम सरदार असाही होता की जो आपल्या आदिलशाही धन्याची चाकरी करूनही स्वराज्यास मदत करीत होता. स्वराज्याची सेवा करीत होता. स्वराज्यास हितकारक होईल असे कृत्य तो करीत होता, त्या निष्ठावंत मुस्लिम सेवकाचे नाव होते, रूस्तमेजमान!

रूस्तमेजमान हा मूळचा आदिलशाही सरदार होता. त्याचे वडील रणदुल्लाखान हे आदिलशाही दरबारातील एक नामवंत असामी होते. अनेक महत्त्वाच्या मोहिमांत त्यांनी पराक्रम केला. पराक्रमाच्या जोरावर अनेक प्रांत त्यांनी जिंकले होते. शहाजी व रणदुल्लाखानाचे अत्यंत मैत्रीचे संबंध होते. रणदुल्लाखानाने शहाजीस बंगळूर प्रांत भेट दिला होता. रणदुल्लाखानाचा मृत्यू हिजरी सन १०५३ मध्ये झाला. रणदुल्लाखानाच्या मृत्युनंतर त्याची जहांगिरी त्याच्या मुलाला म्हणजे रूस्तमेजमानला न मिळता ती स्वतःस मिळावी, अशी योजना अफजलखानाने बनवून रणदुल्लाखानाचा मुलगा वेडसर असून तो ही सर्व जहांगिर सांभाळण्यास असमर्थ आहे असे त्याने आदिलशहास सांगितले आणि रणदुल्लाखानाची संपूर्ण जहांगिरी आपल्या नावे करून तिचा अफजलखान मालक बनला. ही गोष्ट रणदुल्लाखानाचा मुलगा रूस्तमेजमान विसरू शकला नाही. त्यामुळे आपल्या बापाचा मित्र शहाजी व त्याचा पुत्र शिवाजी याचा सहानुभूती बाळगून त्यांचा आधार ठेवणे त्यास योग्य वाटले. आदिलशाहीत माजलेल्या बजबजपुरीचा, कुटील कारस्थानांचा आणि सामान्यांसाठी कर्दनकाळ ठरलेल्या सरदारशाहीचा नायनाट करण्यासाठी तो आदिलशाहीत राहूनच तिला संपविण्याचे कार्य करू लागला. त्याने केलेले कार्य हे स्वराज्यास हितकारक ठरले. अनेक वेळा महत्त्वाचे निर्णय घेण्यास अथवा धोरण ठरवितांना त्याची मदत झाली.

**अफजलखान प्रकरणात मदत**

शिवाजी महाराज आणि अफजलखान यांच्या भेटीत अफजलखानाचा वध करण्यात आला. अफजलखान हा शिवाजी महाराजांना मारायला येणार होता हे निःसंशय सत्य आहे, परंतु ही बातमी शिवाजी महाराजांपर्यंत पोहचविण्याचे काम रूस्तमेजमानने केले होते.

"जमल्यास महाराजांना ठार मारावे, अशी गुप्त सूचना विजापूर दरबाराकडून अफजलखानास देण्यास आली. ही गोष्ट महाराजांचा मित्र विजापूरी सरदार रूस्तमेजमान यांच्याकडून कळली, म्हणून महाराजांनी त्यास मारावयाचे ठरविले."[१]

शिवाजी महाराजांना रूस्तमेजमानने पहिलेच सावध करून ठेवले. त्या आधारावरच महाराजांनी अफजलखानाला मारण्याची योजना आखली. रूस्तमेजमानने विजापूरी दरबारातून ही बातमी शिवाजी महाराजापर्यंत पोहचवून शिवाजी आणि स्वराज्यावर उपकारच केले होते. रूस्तमेजमानला सुद्धा शिवाजी महाराज जिवंत राहणे आवश्यक वाटत होते. कारण आदिलशाही नष्ट करण्यासाठी शिवाजी महाराजांच योग्य शासक आहे असे त्याला वाटत होते. त्याचप्रमाणे आपल्या पित्याची (रणदुल्लाखान) जहांगिरी मिळून घेणारा अफजलखान हा सुद्धा रूस्तमेजमानचा शत्रू होता. म्हणून अफजलखानाला सुद्धा शिवाजी महाराजांनी धडा शिकवावा असे त्याला वाटत होते. शिवाजी महाराज अफजलखानाला ठार मारतील हे रूस्तमेजमानच्या अपेक्षेच्या बाहेरचे होते. परंतु जेव्हा अफजलखानाला शिवाजीने ठार मारले हे रूस्तमेजमानला कळले तेव्हा त्याने खुदाचे आभार मानले आणि शिवाजीच्या दीर्घ आयुष्याबद्दल प्रार्थना केली. शिवाजी महाराज आणि रूस्तमेजमान यांच्यात घनिष्ठ मैत्री निर्माण होण्यास अफजलखान प्रकरण फायदेशीर ठरले होते. त्यानंतर शिवाजीने रूस्तमेजमानला अनेक सोयी सवलती आणि बक्षिसे सुद्धा दिली होती. राजापूरचा गव्हर्नर सुरतला १९ मार्च १६६० च्या पत्रात कळवितो, "रूस्तमेजमान शिवाजीचा स्नेही असल्यामुळे त्याचे मुळचे राजापूर शहर अद्याप त्याच्याकडेच आहे. शिवाजीने त्याला आणखी दोन-तीन शहरे दिली आहेत."[२] म्हणजे शिवाजी महाराज स्वराज्यातील सैनिकांना पराक्रमाबद्दल जे बक्षिसे देत होते. तशाच प्रकारे इतर शासकांकडे किंवा शत्रूच्या गोटात राहून मदत करणाऱ्या आपल्या मित्रांवर सुद्धा बक्षिसांचा वर्षाव करीत होते.

शिवाजी महाराजांचा रूस्तमेजमान हा मित्र सुद्धा मुस्लिम होता. परंतु त्याने आपला जीव धोक्यात घालून स्वराज्याची सेवा केली. तो आदिलशाहीतील गुप्त बातम्या शिवाजी महाराजांपर्यंत पोचवित होता. जेणेकरून महाराजांना त्यावर उपाययोजना करता यावी. शिवाजी महाराजांचा सुद्धा रूस्तमेजमानवर विश्वास होता. त्याने सांगितलेली प्रत्येक बातमी खरी मानून त्या आधारावर ते पुढील योजना आखीत होते. रूस्तमेजमान सारखे विश्वासू सरदार शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीत सहभागी असल्यामुळे महाराजांना आपल्या शत्रूपासून लवकर सावध होता येत होते. अफजलखान प्रकरणात रूस्तमेजमानने केलेली मदत ही बहुमोलाची ठरली. कारण यानंतर शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीची गती वाढली व स्वराज्याच्या शत्रूमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. अफजलखानाला मारून शिवाजी महाराजांनी आपण पराक्रमी व धाडसी आहे हे दाखवून दिले. अफजलखान प्रकरणानंतर मात्र शिवाजी महाराजांचे शत्रू त्यांना घाबरू लागले आणि शिवाजीच्या विरोधात विचारपूर्वक पाऊले उचलू लागले.

**रूस्तमेजमान व आदिलशहा**

रूस्तमेजमान हा बडी बेगमच्या शत्रूगोटातील असल्यामुळे आदिलशहाचा त्याच्यावर विश्वास नव्हता. त्याचप्रमाणे शिवाजी महाराज आणि रूस्तमेजमान यांचे मैत्रीचे संबंधाबद्दल सुद्धा आदिलशहाला खबर लागली होती. त्यामुळे तो शिवाजीस कितपत कडवा विरोध करू शकेल याची त्याला शंकाच होती. त्यामुळेच पन्हाळगड काबीज करण्यासाठी आदिलशहाने रूस्तमेजमान बरोबर आपल्या विश्वासातील फाजलखान, मलिक इतबार, सादतखान, फतेहखान, मुल्लाहय यांसारख्या सरदारांना पाठविले. या संदर्भात डच गव्हर्नरने गर्व्हनर जनरलला १६६० च्या एप्रिल महिन्यात माहिती पाठविली ती अशी की, ".. यावरून स्पष्ट दिसते की, ४० हजार होन घेऊन रूस्तमेजमान अंतस्थरीतीने शिवाजीला सामील आहे, त्यामुळे रूस्तमेजमान जरी बादशाही नोकर व मित्र म्हणवितो तरी त्याच्यावर बादशहाचा बिलकूल विश्वास नाही."[३]

पन्हाळगडाच्या या युद्धात शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याची रचना योजनाबद्ध पद्धतीने करून रूस्तमेजमानला कसे वाचविता येईल याचा विचार केला होता. स्वतः शिवाजी महाराज या युद्धात रूस्तमेजमानसोबत लढले होते. या युद्धात फाजलखान गर्भगळीत झाला. आदिलशाही सैन्याचा धुव्वा उडाला. त्याच्या पाठोपाठ अन्य सरदारही पळाले. शेवटी रूस्तमेजमानही पळाला. त्यावेळी त्याच्या सोबत फक्त पाच-सहा स्वार होत. वास्तविक रूस्तमेजमानला यावेळी महाराज सहज पकडू शकले असते, कैद करू शकले असते, परंतु महाराजांनी तसे केले नाही. उलट त्याला पळायला संधी दिली. या संदर्भात कोल्हापूरच्या रेव्हिंग्टन या अधिकाऱ्याचे ४ फेब्रुवारी १६६० चे पत्र मिळाले ते असे, "...पन्हाळगडावर असलेल्या शिवाजीच्या सैन्यावर आदिलशाही सैन्य चालून येत होते. राजापूरहून पन्हाळगडावर येतांना वाटेतच उभय सैन्याची गाठ पडली. फाजलखान आघाडीवर होता. त्याच्या सैन्याचा धुव्वा उडाला. रूस्तमेजमानचे फार नुकसान न होता तो हुकेरीवर मागे सरला... रूस्तमेजमान आपल्या माहितीप्रमाणे शिवाजीचा दोस्त आहे. रूस्तमेजमान फाजलखानच्या बरोबर जाऊन लढला ही गोष्ट वरवर धोरणाची होती, कारण आता तो शिवाजीच्या अंगावरून विजापूरला जात आहे. तेव्हा त्याला काडीचाही विरोध करीत नाही."[४]

"या मोहिमेच्या वेळी रूस्तमेजमानने फाजलखानादी सैन्याच्या तुकडीला आवश्यक तेवढी अन्नसामुग्रीची मदत वेळेवर न दिल्यामुळे त्यांना उपासमार सहन करावी लागली. साहजिकच युद्धाच्या वेळी त्यांच्यात सामर्थ्य राहिले नसल्यामुळे हतवीर्य होऊन त्यांना परतावे लागले."[५]

रूस्तमेजमान आपली मैत्री आणि स्वराज्यसेवा दोन्ही चांगल्या तऱ्हेने निभावत होता. आदिलशहाला जरी त्याचा कानोसा लागला असला तरी त्याने त्याची पर्वा केली नाही. आतापर्यंत तो लपून मदत करीत होता. पण आता मात्र उघडपणे त्याने शिवाजी महाराजाला मदत केली होती.

हुबळीच्या हल्ल्याच्या वेळी रूस्तमेजमानने स्वतःचे सैन्य महाराजांसोबत दिले होते. त्यासंबंधी ६ जानेवारी १६६५ च्या कारवारकरांच्या पत्रात लिहिले आहे की, "हुबळीची लूट झाल्यासारखीच दैन्यावस्था झाली आहे. आलेल्या स्वारांमध्ये काही रूस्तमेजमानचेही स्वार होते, असे

म्हणतात, रूस्तमेजमान शिवाजी उभयतामिळून हल्लीच्या सुलतानाला पदच्युत करून दुसऱ्यास गादीवर बसवतील असा लोकांचा समज आहे..."[६]

रूस्तमेजमान आणि शिवाजी महाराज यांच्यातील मैत्री दिवसेंदिवस वाढतच चालली होती आणि ही अफवा सुद्धा उडाली की, आदिलशहाला पदच्युत करून दुसरा कुणीतरी गादीवर बसवणार आहे.

जरी तो शिवाजीला मदत करीत असला तरी मात्र त्याच्याविरूद्ध ठोस असा पुरावा अजून पर्यंत आदिलशहाला मिळाला नव्हता. त्यामुळे आदिलशहाने त्याच्या कारवायांकडे कानाडोळा केला. परंतु महत्त्वाची कामगिरी त्याच्यावर सोपवितांना (शिवाजी महाराजांच्या विरोधात) मात्र आदिलशहा आपल्या विश्वासातील काही सरदार त्याच्यासोबत पाठवित होता. याचा अर्थ आदिलशहाला रूस्तमेजमानच्या शिवाजी सोबत असलेल्या संबंधाची कल्पना आली होती. परंतु तो ठोस पुराव्याची वाट पाहात होता.

**नेताजी पालकर व रूस्तमेजमान**

रूस्तमेजमानने शिवाजीलाच मदत केली नाही, तर त्यांच्या सैन्यात असलेल्या सेनापती नेताजी पालकर यास सुद्धा मदत केली होती. रूस्तमेजमानच्या मदतीमुळेच नेताजी पालकर मोगलांच्या हाती सापडला नाही. या संदर्भात राजापूरचा फिलीप गिफर्ड नावाचा अधिकारी सूरतला ३० मार्च १६६३ च्या पत्रात लिहितो, "नेताजी मोगलांचे मुलूखात लूटालूट करण्यास गेला होता. त्याचा पाठलाग करून ते नुकतेच परतले आहे. ह्या सैन्याने त्याचा इतक्या जोराने पाठलाग केला की त्याला रोजी ४५ ते ५० मैलांची दौड करावी लागली. त्याला लूट थोडी सापडली पण त्रास पुष्कळच पडला, नेतालीचा पाठलाग करीत हे लोक विजापूर पासून अगदी १५ मैलांवर पोचले. विजापूरच्या राणीला भय वाटून १०० घोडेस्वार घेऊन ती बंकापूरला पळाली. रूस्तमेजमानने मोगलांना भेटून आपल्या स्वत:पुरता तह केला. काय होईल ते न कळे."[७] यानंतर पुन्हा त्याचे पत्र ८ एप्रिल १६६३ रोजीचे आले ते असे, "रूस्तमेजमानची आणि मोगलांची भेट झाली. परंतु अटी काय ठरल्या हे अजून कानावर आले नाही. ह्या भेटीनंतर त्याने नेताजीचा पाठलाग न करण्याबद्दल मोगलांचे मन वळविले. पुढील प्रदेश अपरिचीत सैन्यांच्या हालचालींना धोक्याचा आहे यासाठी आपणच नेताजीचा पाठलाग करतो असे कपटाने मोगलांना सांगून नेताजीला पळून जाण्यास त्याने सवड दिली."[८] या संदर्भात आणखी एक पुरावा मिळतो. ३० मार्च १६६३ च्या इंग्रजी रेकॉर्डमध्ये अशी माहिती मिळते.

"The Mughals in pursuit of Shivaji's General Netaji Palkar, came within a few kilometers of Bijapur, Adilshaha took fight and moved away the Bankapur while Rustumzaman persuaded the Mughals to withdrawal and this enabled Netaji to move safty."[९]

रूस्तमेजमानच्या मदतीचे कितीतरी पुरावे मराठा इतिहासात आहे. त्याने केलेली मदत मराठ्यांसाठी फलदायी ठरली. नेताजी पालकराला वाचवून त्याने मराठ्यांच्या सैन्याचा सेनापती वाचविला नव्हता तर स्वराज्याचा खंदा पुरस्कर्ता आणि ज्याला प्रती शिवाजी म्हणून ओळखण्यात येत होते, त्याला वाचविले होते, आपल्या चतुराईने रूस्तमेजमानने मोगलांचे मन वळवून त्यांना नेताजीचा पाठलाग करण्यापासून परावृत्त केले. नेताजी पालकर हा मराठा सैन्यातील पराक्रमी योद्धा आहे याची जाणीव रूस्तमेजमानला होती. नेताजी जर मोगलांच्या हातात सापडला तर शिवाजी आणि स्वराज्य यांचे फार मोठे नुकसान होईल म्हणून आपल्याने जर नेताजीला वाचविणे शक्य आहे तर स्वराज्यसेवा म्हणून हे कार्य आपण करायलाच पाहिजे. त्यानुसार त्याने नेताजीला मोगलांच्या तावडीतून दूर जाण्यास सवड सुद्धा मिळवून दिली. रूस्तमेजमानचे हे कार्य म्हणजे शिवशाहीसाठी अमूल्य अशी मदत होती.

**रूस्तमेजमानची स्वराज्यनिष्ठा**

स्वराज्यनिष्ठा वाहिल्यावर शिवाजीप्रती कुठल्याही परिस्थितीत गद्दारी होणार नाही, याची खबरदारी रूस्तमेजमानने घेतल्याचे दिसून येते. कुठल्याही परिस्थितीत शिवाजीस अथवा स्वराज्यास धोका होणार नाही, याची तो नेहमी काळजी घ्यायचा. अनेक वेळा स्वत: धोक्यात राहून त्याने शिवाजीस सहकार्य केले आहे.

शिवाजीने फोंडा किल्ल्याला वेढा देण्यासाठी २००० सैनिक पाठविले. दोन महिने फोंड्याचा वेढा चालूच होता. या दरम्यान शिवाजीचे ५०० लोक दगावले. शेवटी कंटाळून किल्ल्यातील लोकांनी आपल्या वस्तू घेऊन जाण्यास परवानगी मिळावी, या अटीवर शिवाजीच्या हवाली किल्ला देण्यात आला.

शिवाजीने फोंडा किल्ला घेतला ही हकीकत जेव्हा आदिलशहाच्या कानावर गेली, तेव्हा आदिलशहाने शिवाजीच्या पारिपत्यासाठी सिद्दी मसऊद, सिद्दी जोहरचा मुलगा व रूस्तमेजमान अशा तिघा सरदारांना पाठविले. त्यांच्याबरोबर ५००० स्वार आणि १००० पायदळ होते. "यावेळी शिवाजी आपल्या देशात आहे, असे कळताच सिद्दी मसऊद रूस्तमेजमानला घेऊन हल्ला करण्यास निघाला. रूस्तमेजमानची या गोष्टीला मनापासून संमती नव्हती. टाळाटाळ करून शेवटी त्याला जावे लागलेच. बरोबर फौजफाटा घेऊन ते शिवाजीवर हल्ला करण्यास निघाले. ते सैन्य शिवाजीच्या मुक्कामाजवळ येताच रूस्तमेजमानने तुताऱ्या व नगारे वाजवून शिवाजीस सावध केले."[१०]

शिवाजी महाराजांनी अशी अनमोल मदत करणारा रूस्तमेजमान शेवटी आदिलशहाला पुराव्या सहीत सापडला. "पाठलागाहून परत येतांना शिवाजीचे पत्रे रूस्तमेजमानकडे नेणारा एक जासूद सिद्दी मसऊदने पकडला. त्याला आदिलशहाकडे त्याने रवाना केले. त्याबरोबर मित्राच्या रद्दबदलीमुळे एकवार माफी होत आहे. पुढे सांभाळून रहा... नाहीतर तुला कामावरून कमी केले जाईल... असा सुलतानाचा खलिता आला."[११] आदिलशहाने रूस्तमेजमानला दिलेला इशारा त्याची स्वराज्यनिष्ठा उघडकीस आणतो. आता रूस्तमेजमान आदिलशहाला पुराव्यासहीत सापडला होता. तरीपण रूस्तमेजमानने स्वराज्य सेवा सोडली नाही तो शिवाजी महाराजांशी एकनिष्ठ राहिला.

**निष्कर्ष :-**

स्वराज्यासाठी लढणारे सैनिक फक्त मराठा सैन्यातच राहून आपल्या प्राणाची बाजी लावत नव्हते तर शत्रूच्या सैन्यात राहून, शत्रूच्या प्रदेशात राहून स्वराज्याला बहुमोल मदत करीत होते. आपण जे करतो आहे ते जरी राजकीयदृष्ट्या बेईमानी ठरत असेल तरी नैतिकदृष्ट्या मात्र बरोबर आहे, असे रूस्तमेजमानला वाटत होते. शिवाजी महाराज ज्या ध्येयाने प्रेरीत होऊन कार्य करीत आहे ते उत्कृष्ट असं कार्य आहे, यात जर आपण पूर्णपणे सहभागी होऊ शकत नसलो तरी मात्र आपल्याकडून जी मदत होते ती आपण करायला पाहिजे. कारण अन्यायी, अत्याचारी व दुष्ट प्रवृत्तीला नष्ट करण्यासाठी महाराजांचा लढा आहे. त्यांनी कुण्या धर्माविरोधी आपले कार्य सुरू केले नाही. म्हणून त्यांचे कार्य हे मानवाच्या कल्याणाचे व हिताचे आहे. स्वराज्य निर्मितीतून सुराज्य निर्माण करणे म्हणजे मानवी समाजाची निर्मिती करणे होय. ज्या समाजात जात, धर्म, पंथ यात मतभेद राहात नाही. सर्व धर्म आणि जातींना सारखे स्वातंत्र्य असते. अशा मानवी समाज शिवाजी महाराज आपल्या पराक्रमातून आणि लोककल्याणातून करणार आहे. त्यासाठी आपण काही का होईना मदत करायला पाहिजे आणि शिवाजी महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यास आपला सहभाग द्यायला पाहिजे असे रूस्मतेमजमानला वाटले. त्याने शिवाजी महाराजांची जात किंवा धर्म पाहिला नाही. तर त्यांच्या लोककल्याण आणि पराक्रमावर तो आकर्षित झाला होता.

आदिलशाही आणि मोगलशाही नष्ट करण्याची ताकद फक्त शिवाजी महाराजांमध्ये आहे हे रूस्तमेजमान जाणून होता. आदिलशाहीत होणारे जुलूम तो आपल्या डोळ्याने पाहात होता. त्यामुळे त्याला शिवाजीचे राज्य म्हणजे मानव विकासाची व न्यायीपरंपरेचे जिवंत प्रात्यक्षिक दिसत होते. ते जर टिकवून ठेवायचे असेल तर शिवाजी महाराजांना मदत करणे आवश्यक आहे. हे त्याला जाणवू लागले आणि त्याने तशाप्रकारे मदत सुद्धा केली. अफजलखान प्रकरणात शिवाजी महाराजांचे पहिल्यांदा प्राण वाचविणारा रूस्तमेजमान होता, असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. कारण त्याने जर शिवाजी महाराजांना सावध केले नसते तर महाराज सर्व तयारीनिशी गेले नसते. महाराजांचा पूर्ण विश्वास रूस्तमेजमानवर असल्यामुळे महाराजांनी खानाला भेटण्याची पूर्ण तयारी केली. आदिलशहाला जर माहित झाले तर आपली नोकरी तर जाईलच परंतु आपले प्राण सुद्धा जावू शकतात ही जाणीव असून सुद्धा रूस्तमेजमान महाराजांना मदत करीत होता. नेताजी पालकर हा स्वराज्याचा सेनापती जेव्हा संकटात सापडतो तेव्हा शत्रूच्या गोटातील मित्र म्हणजे रूस्तमेजमान त्याच्या मदतीला धावून येतो आणि त्याचा जीव वाचवितो. शिवाजी महाराजांना शत्रूच्या सैन्यापासून सावध करून त्यांना उपाय योजना करण्यास वेळ निर्माण करून देतो. म्हणजे कितीतरी मदत रूस्तमेजमान आपल्या परीने करण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक वेळी त्याच्या मदतीने स्वराज्याचा फार मोठा फायदा झालेला आहे.

आदिलशाही सैन्यात राहून त्यांच्याच विरोधात कार्य करणे म्हणजे फार मोठी हिंमत रूस्तमेजमान जवळ होती. त्यांच्यात ही निष्ठा आणि हिंमत महाराजांच्या गुणवैशिष्ट्याने निर्माण झाली होती. महाराजांचा पराक्रम आणि कार्यशैली पाहून तो भारावून गेला होता. इतर शाह्यातील सरदार आणि सैनिक जेव्हा आपल्या मूळ धन्याची चाकरी सोडून शिवाजी महाराजांकडे जात होते. तेव्हा निश्चितच महाराजांजवळ अतुलनीय शक्ती आहे, असा ठाम विश्वास रूस्तमेजमानला होता. म्हणूनच आपण सरळ शिवाजी महाराजांच्या सैन्यात दाखल न होता आदिलशाहीत राहूनच शिवाजीला मदत करावी असा निर्णय त्याने घेतला आणि त्याप्रमाणे तो कार्य सुद्धा करू लागला. अशा निष्ठावान मुस्लिम सैनिकांमुळेच शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करण्यात यशस्वी झाले.

**संदर्भ :-**

१) पगडी, सेतु माधवराव, ***शिवचरित्र - एक अभ्यास***, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. २६०.
२) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***शिवकालीन पत्रसार संग्रह***, खंड १ (शके १४८८ ते १६०४), शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, पृ. १८४.
३) तत्रैव.
४) तत्रैव, पृ. १८०.
५) हनवते, प्रेम, ***शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक***, सुधीर प्रकाशन, वर्धा, १९९४, पृ. ५९.
६) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***पूर्वोक्त***, संग्रह क्रमांक १०५९.
७) तत्रैव, पृ. १८४.
८) तत्रैव, पृ. १८५.
९) Pagadi, Setu Madhavrao, ***Chatrapati Shivaji***, Continental Publication, Pune, 1974, p. 38.
१०) हनवते, प्रेम, ***पूर्वोक्त***, पृ. ९२.
११) केळकर, न.चि., आपटे, द.वि. (संपा.), ***पूर्वोक्त***, संग्रह क्रमांक १०२६.